# कोरोना विषाणु प्रादुर्भावाचा कृषि शिक्षणावरील परिणाम

## वनामकृवित आयोजित राष्ट्रीय ऑनलाईन प्रशिक्षणाचा समारोप



**परभणी/प्रतिनिधी**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील भारतीय कृषि अनुसंधान परिषद व जागतिक बँक पुरस्कृत राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प नाहेप वतीने दिनांक ९ ते १३ जुन दरम्यान एक आठवड्याचे ऑनलाईन राष्ट्रीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण वर्गाचा समारोप दिनांक १३ जूनला झाला.

अध्यक्षस्थानी वनामकृविचे कुलगुरू डॉ.अशोक ढवण हे होते. तर जयपुर येथील राष्ट्रीय कृषि विपणन संस्थेचे संचालक डॉ.चंद्रशेखर, मुंबई येथील मनोचिकीत्सक डॉ.राजेंद्र बर्वे, शिक्षण संचालक डॉ.धर्मराज गोखले आदींचा प्रमुख सहभाग होता. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. ढवण म्हणाले की, सध्याच्या कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावाच्या परिस्थितीत डिजीटल व्यासपीठाच्या माध्यमातून विद्यापीठ शेतकरी, विद्यार्थी, संशोधक आदींपर्यंत पोहचत आहे. शेतकऱ्यांपर्यंत उपयुक्त कृषि तंत्रज्ञान योग्य वेळी व प्रभावीपणे पोहचविण्यासाठी याचा करावा, असे प्रतिपादन त्यांनी केले.

मार्गदर्शनात डॉ.चंद्रशेखर यांनी कोरोना विषाणु रोगाच्या काळात शेतकऱ्यांनी करिता गटशेतीच्या माध्यमातून डिजीटल ॲपचा वापर करून थेट ग्राहकांशी संपर्क साधून शेतमाल विक्री करावा, असा सल्ला दिला. नाहेपचे प्रमुख समन्वयक डॉ.गोपाळ शिंदे यांनी प्रकल्पाची भुमिका विशद केली. प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेचे उपसंचालक पद्मश्री डॉ.रमण गंगाखेडकर, एमजीएम आरोग्य विज्ञान संस्थेचे कुलगुरू डॉ.शशांक दळवी, आयआयटी पवईचे विभागप्रमुख डॉ.सतीश अग्निहोत्री, प्रसिध्द वैद्यकीय तज्ञ डॉ.रामेश्वर नाईक, डॉ.किरण सगर, डॉ.आनंद देशपांडे, डॉ.आशा आर्या, डॉ.लीना बडगुजर, डॉ.सुजा कोशी, डॉ.राजेंद्र बर्वे आदींनी मार्गदर्शन केले. समारोपात निवड प्रशिक्षणार्थी शैलेंद्र कटके, डॉ.प्रेरणा धुमाळ, डॉ.स्मिता देशमुख, अंशु कर्ण आदींनी आपले मनोगत व्यक्त करून प्रशिक्षणातील मार्गदर्शनाचा निश्चित लाभ होईल अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रशिक्षण वर्गात नेपाळ, पाकिस्तान, जपान आदींसह देशातील २५ राज्याहून ४५० कृषिचे विद्यार्थी, प्राध्यापक व शास्त्रज्ञांनी सहभाग घेतला होता. प्रशिक्षण वर्गाचे आयोजन सचिव डॉ.वीणा भालेराव, प्रा संजय पवार, डॉ.मेघा जगताप आदींनी केले तर तांत्रिक सहाय्य डॉ.अविनाश काकडे, डॉ रश्मी बंगाले, शैलेश शिंदे यांनी केले.